जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
महसुल शाखा
क्र.Maval/NA/SR/४०/२०१७
पुणे -१ दिनांक ०९/११/२०१७

प्रति,

कामगार तलाठी कान्हे,
ता. मावळ, जि.पुणे

विषय- मौजे कान्हे, ता. मावळ, जि. पुणे येथील जमीन ग.नं. १८७/१ मधील एकुण ३५४८९.६० चौ.मी. पैकी हरीतपट्टयाचे २७३५.४० चौ. मी. क्षेत्र वजा जाता ३२७५४.२० चौ. मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ क अन्वये अकृषिक झाल्याची नोंद घेणेबाबत.

संदर्भ :- १) श्री. गोविंद सिताराम दाभाडे, व इतर १ रा. ४ था मजला, कॉमस अव्हेन्यु, पौड रोड, पुणे -४११ ०३८ यांचा दि.१७/१०/२०१७ रोजीचा अर्ज
२) महाराष्ट्र शासन,महसुल व वनविभाग यांचेकडील दि.०५/०१/२०१७ रोजीची अधिसुचना व शासन परिपत्रक क्र.एनए-२०१७/प्र.क्र.११५/टी-१ दि.१९ ऑगस्ट २०१७

२/- मौजे कान्हे, ता. मावळ, जि. पुणे येथील जमीन ग.नं. १८७/१ मधील एकुण ३५४८९.६० चौ.मी. पैकी हरीतपट्टयाचे २७३५.४० चौ. मी. क्षेत्र वजा जाता ३२७५४.२० चौ. मी. क्षेत्रास निवासी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ क अन्वये निवासी प्रयोजनार्थ अकृषिक आकारणी करुन मिळावी म्हणून अर्जदार **श्री. गोविंद सिताराम दाभाडे, व इतर १ रा. ४ था मजला, कॉमस अव्हेन्यु, पौड रोड, पुणे -४११ ०३८** यांनी या कार्यालयाकडे संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

सदर मिळकतीवरील बांधकाम नकाशास पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण यांचेकडील **जा.क्र. DP/ बीएमए/मौजे कान्हे/स.नं.१८७/१/प्र.क्र.४९७/१७-१८, दिनांक:-११/०५/२०१७** अन्वये दिलेल्या प्रारंभ प्रमाणपत्राची व बांधकाम नकाशाची प्रत सादर केलेली आहे.

अर्जदार यांनी केलेल्या विंनंतीच्या अनुषंगाने आगाऊ बिनशेतसारा शासन जमा करणेबाबतच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | जमिन मालकाचे नाव | गावाचे नाव | स.नं./ग. नं. | प्रस्तावित क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १ | **श्री. गोविंद सिताराम दाभाडे<br>सौ. सुनंदा गोविंद दाभाडे** | **मौजे कान्हे, ता. मावळ, जि. पुणे** | १८७/१ पै. | ३५४८९.६० चौ.मी. |
| २ | अर्जदार यांचे नावे असलेले व मंजूर रेखांकन नकाशात समाविष्ट केलेले क्षेत्र | | | ३५४८९.६० चौ.मी. |
| ३ | (-) हरीतपट्टयाचे क्षेत्र | | | २७३५.४० चौ. मी. |
| ४ | अकृषिक आकारणीस निव्वळ क्षेत्र | | | ३२७५४.२० चौ. मी. |
| ५ | वापरात बदलाचे प्रयोजन | | | निवासी |

अर्जदार यांना या कार्यालयाकडील पत्र क्र.Maval/NA/SR/४०/२०१७, दि.०९/११/२०१७ अन्वये खालीलप्रमाणे बिनशेतसारा शासनजमा करणेबाबत कळविणेत आलेले होते. त्यानुसार खालील प्रमाणे आकारणी केली आहे.

| अक्र | तपशील | निवासी |
|---|---|---|
| १ | बिगरशेती आकारणी (क्षेत्र ३२७५४.२० चौ.मी.) | ३२७५४.२० चौ. मी. |
| २ | बिनशेती आकारणीचा दर (प्रति ०.१० चौ.मी. ) | रु ०.१० पैसे |
| ३ | बिनशेती करावयाच्या क्षेत्रावरील वार्षिक आकारणी | ३२७६.०० |
| ४ | रुपांतरीत कराची आकारणी | १६३८०.०० |
| ५ | जिल्हा परिषद कर | २२९३२.०० |
| ६ | ग्रामपंचायत कर | ३२७६.०० |
| ७ | अनधिकृत अकृषिक वापराबाबत ४० पट दंड | ०.०० |
| ८ | इनाम वर्ग ६ ची जमिन असल्याने ५० टक्के नजराना रक्कम | ०.०० |
| ९ | एकूण रक्कम रुपये. | ४५,८६४.०० |

वरीलप्रमाणे अर्जदार यांनी देय ४५,८६४/- एवढी रक्कम शासनजमा करुन GRN No.MH007054054201718M, दि.०९/११/२०१७ रोजीचे डिफेसड्र चलनाची प्रती या कार्यालयास सादर केलेल्या आहेत.

तसेच विषयांकीत मिळकतीवरील बांधकाम नकाशास पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण यांचेकडील पत्र **जा.क्र. DP/बीएमए/मौजे कान्हे/स.नं.१८७/१/प्र.क्र.४९७/१७-१८, दिनांकः-११/०५/२०१७** अन्वये दिलेल्या प्रारंभ प्रमाणपत्राची व मंजूर बांधकाम नकाशाची प्रत सादर केलेली आहे.

सबब, आपणास यादवारे कळविणेत येते की, विषयांकीत जमीनीच्या **गाव नमुना नं. ७/१२ व गाव नमुना नं.२ मध्ये अकृषिक झाल्याची नोंद "(बिनशेतीकडे ३२७५४.२० चौ.मी)"** अशी नोंद घेणेसाठी चलनाची व बांधकाम नकाशाची प्रत सोबत जोडली आहे. सदरची नोंद गाव दप्तरी घेणेत येऊन दुरुस्त अधिकार अभिलेखाची प्रत अर्जदारास उपलब्ध करुन देणेत यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दुरुस्त अधिकार अभिलेखासह सादर करावा. त्यानुसार अर्जदार यांचेकडून दर वर्षी अकृषिक आकारणी करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

मा. जिल्हाधिकारीसो.
यांचे मान्यतेने

सही XXX
(प्रल्हाद हिरामणी)
जिल्हाधिकारी, पुणेकरीता

**प्रत:- १) श्री. गोविंद सिताराम दाभाडे, व इतर १**
रा. ४ था मजला, कॉमस अव्हेन्यु, पौड रोड, पुणे -४११ ०३८
२) महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण

**प्रतिः-तहसिलदार मावळ, जि.पुणे**

२/- विषयांकीत मिळकत बिनशेती झालेबाबत तालुका नमुना नं २ ला नोंद घेणेकामी व वर नमुद केलेप्रमाणे कार्यवाही झाली किंवा कसे? याची पडताळणी आपले स्तरावरुन करणेच्या अनुषंगाने मुळ संचिका अभिलेखात जतन करणेकामी सोबत पान क्र. १ ते जोडली असे.

(प्रल्हाद हिरामणी)
जिल्हाधिकारी, पुणे करीता